Impact Factor: 6.017

ISSN: 2278-9529

# GALAXY

## International Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed e-Journal

Vol.15, Issue- 1 January 2026

**15 Years of Open Access**

Editor-In-Chief: Dr. Vishwanath Bite

Managing Editor: Dr. Madhuri Bite

www.galaxyimrj.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उच्च शिक्षण विषयक विचार

प्रा. डॉ. बी. एम. नरवाडे
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख),
श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
हदगाव जि. नांदेड

गोषवारा:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारतातील महान विचारवंत, समाज सुधारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार होते. त्यांनी शिक्षणाला, विशेषतः उच्च शिक्षणाला, सामाजिक समता, आर्थिक स्वावलंबन आणि लोकशाही सशक्तीकरणाचे प्रमुख साधन मानले. कारण भारतीय समाज हा जात, वर्ग आणि लिंगाधारीत विषमतेने ग्रस्त होता. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. त्यांचे प्रसिध्द वाक्य म्हणजे ”शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा” हे शिक्षणाच्या केंद्रीय भूमिकेचे धोतक होते. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून वंचित घटकांना बौध्दीक बळ, आत्मसन्मान आणि नेतृत्व क्षमता प्राप्त होऊ शकते असा त्यांचा ठाम विश्वास होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वतःचे शैक्षणिक जिवन त्याच्या विचारांना आकार देणारे ठरले. कोलंबीया विद्यापीठ (अमेरिका) आणि लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स येथे त्यांनी उच्च

शिक्षण घेतले. जागतीक दर्जाचे शिक्षण संशोधन पध्दती आणि लोकशाही मूल्यांचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव पडला होता. या अनुभवातूनच त्यांनी भारतातील उच्च शिक्षण सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्वक असावे असा आग्रह धरतात. त्यांचे उच्चशिक्षण विषयक विचार त्यांनी केलेले विविध लेखन आणि त्यांच्या भाषणामधून दिसून येतात. त्यांनी आपल्या भाषणामधून शिक्षणाच्या विविध 32 उच्च पदव्या घेतल्या होत्या. आजच्या डिजिटल युगात उच्च शिक्षणाची उपलब्धता वाढली आसली तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले शिक्षणाचा अधिकार कुणालाही नाकारता येत नाही. हे तत्व आजूनही प्रासंगिक आहे. विशेषतः ग्रामीण व वंचित वर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी नितीनिर्माणात त्यांच्या विचारांचा उपयोग होत आहे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उच्च शिक्षण विषयक विचारांचे तात्विक अधिष्ठान, उद्दीष्ट्ये, सामाजिक परिणाम व आजच्या संदर्भातील उपयुक्तता यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**प्रस्तावना :**

भारतामध्ये खऱ्या अर्थाने इंग्रजाच्या राजवटीमध्येच शिक्षणाचा प्रसार सुरू झाला. या शिक्षणामुळे नविनविचार मुल्य व जिवनमुल्यांचा परिचय झाला. यातूनच नव्या जानीवांचा उदय झाला. जिवनाकडे पाहण्याची जिवनवादी, विज्ञानवादी, परिवर्तनवादी आणि मानवतावादी दृष्टी

लाभून समाजप्रबोधनाची नवी चळवळ भारतात उभी राहीली. अशातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रील 1891 रोजी झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षणासाठी झिजविले त्यांनी एकूण विविध विषयातील 32 पदव्या घेतल्या. म्हणून या देशातील सर्वोच्च विद्वान ठरले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा इतिहास राष्ट्राला प्रेरणादायी स्वरूपाचा आहे. तत्कालीन दलित चळवळीचे प्रणेते, दलितांचे कैवारी, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, आधुनिक भारताचे ज्ञानयोगी स्वकर्तबगारीने युगप्रवर्तक बनलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताला ज्ञात आहेत.[1] आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेबांचा सिंहाचा वाटा आहे. आपले मानवी हक्क मिळविण्यासाठी अस्पृश्यांनी स्पृश्य समाजाशी संघर्ष करावा त्यासाठी सर्वप्रथम शिक्षणाकडे लक्ष पुरवावे आणि उच्च शिक्षण घ्यावे असे त्यांनी सांगितले. भारतीय लोकशाही प्रवाहात देशातील सर्वसामान्य अस्पृश्य जनता यांच्याकरीता त्यांचे कार्य शैक्षणिक दृष्ट्या मोलाचे आहे. म्हणूनच त्यांनी भारतीय संविधानाच्या 45 व्या कलमामध्ये वय वर्ष 06 ते 14 या वयोगटातील सर्व मुलांमुलींना सक्तीचे व मोफत व सार्वजिक शिक्षण देण्याचे नमुद केले आहे. समता, स्वातंन्त्र्य, बंधूता आणि न्याय या लोकशाहीच्या मुल्यांवर आधारीत समाजरचना घडविण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची जाणीव त्यांना होती. त्यामुळे त्यांनी "नागरिकांना जाणीव करून देते ते शिक्षण होय." अशी शिक्षणाची व्याख्या केली आहे. तसेच 10 आक्टोंबर 1947 रोजी सिध्दार्थ महाविद्यालय येथील भाषणात ते म्हणाले होते की,

आपल्यात आर्थिक सुबत्ता हिच उपेक्षितांना मानाचे स्थान प्राप्त करून देते. समाजाची उन्नती ही शिक्षणावर आधारलेली आहे. त्यामुळे समाजाची व देशातील नागरिकांची उच्च शिक्षणाशिवाय दुसऱ्या कशानेच प्रगती होणार नाही. आपल्या सर्व सामाजिक दुःखावर शिक्षण हे एकमेव प्रभावी औषध आहे.[2] असे औषध म्हणजेच उच्च शिक्षण हे सर्व स्त्री-पुरूषांना एकच व एकत्र दिले पाहिजे असे बाबासाहेबांचे मत होते. 'उच्च शिक्षण म्हणजे शालेय शिक्षणाच्या पुर्ततेनंतर साधारणतः वय वर्ष 18 किंवा अधिक असणाऱ्या वयोगटातील पीढीला दिले जाणारे शिक्षण उच्च शिक्षण म्हणून ओळखल्या जाते."[3] उच्च शिक्षणातून मनुष्याच्या सर्वांगीन विकास होऊ शकतो यावर बाबासाहेबांचा ठाम विश्वास होता तसेच भारतीय समाजाचा सर्वांगीन विकास साधवयाचा असेलतर उच्चशिक्षणापेक्षा दुसरे मोठे साधन नाही यावर त्यांची गाढ श्रध्दा होती.

डॉ**.** बाबासाहेब आंबेडकर यांचे उच्च शिक्षणविषयक विचार **:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जिवनात आणि कार्यात उच्च शिक्षणाला आतिशय मोलाचे स्थान होते. ते आपल्या शेवटच्या क्षणापर्यंत विद्यार्थीच होते. विद्याव्यासंग म्हणजे त्यांचे जिवन होते. मुंबई येथील सेंट जेवियर्स महाविद्यालयातमध्ये प्राध्यापकांना मार्गदर्शन करताना म्हटले होते की, महाविद्यालयात जी सामान्य स्तराची शिक्षण पध्दती आहे ती बदलली पाहीजे. एकाच शहरातील वेगवेगळया महाविद्यालयामध्ये एकच विषय अनेक प्राध्यापकाकडून शिकविला जातो.

त्या ऐवजी विशिष्ट महाविद्यालयात विशिष्ट विषय शिज्ञकवण्याची सोच करून त्या विशिष्ट विषयातील पोट विषयाचे वाटप केले पाहीजे. म्हणजेच एकाच विषयाचे सात-आठ प्रोफेसर असतील त्यामुळे त्यांच्या कार्याची विभागणी होईल, परिणामी विषयाचे सुध्दा विभाग पडतील आणि प्रत्येक प्राध्यापक स्वतःच्या विषयाचा सखोल अभ्यास करू शकेल आणि त्यास त्यांच्या विषयामध्ये संशोधन करण्यासाठी भरपूर वेळ मिळेल.[4] म्हणजेच शिक्षणपध्दतीमध्ये बदल झाला पाहीजे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणपध्दतीबरोबरच वृत्तीविषयी सुध्दा मत मांडलेले आहे ते म्हणतात की, प्राध्यापकांनी विध्यार्थामध्ये उत्साह निर्माण केला पाहीजे त्यासाठी ते उत्साही असले पाहीजे तसेच त्यांनी अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाच्या कार्यात स्वतःला वाहुन घेतले पाहीजे. घरकाम पत्नीवर सोपविले पाहीजे. प्राध्यापकांनी जास्त जबाबदाऱ्या अंगावर घेऊ नये. त्याचप्रमाणे त्यांनी प्राध्यापकांच्या निष्क्रीयतेवर सुध्दा टिका करताना म्हणतात की, प्राध्यापकांनी थोडेसे रूपये मिळवावेत व आपली सुखाने कालक्रमणाव्हावी याशिवाय आपल्याकडे आमच्या प्राध्यापकांच्या आयुष्यात काही महत्वाकांक्षाच नाही या महत्वाकांक्षेच्या अभावामुळे त्यांच्या हातून काहीही भरीव कार्य होत नाही. म्हणून प्राध्यापकांनी अध्ययन, अध्यापन, संशोधन यात स्वतःला सतत गुंतवुन ठेवले पाहीजे. अभ्यासाची शिस्त बाळगावी प्राध्यापक नुसताच विद्वान असुन चालणार नाही व सर्वश्रुत असवा, उत्साही आसावा आणि संशोधक असावा.[5] म्हणजेच प्राध्यापकांनी आपल्या विषयाच्या

ज्ञानासोबतच इतरही विषयाचे ज्ञान अवगत करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर बाबासाहेबांची विद्यार्थ्याकडून सुध्दा बऱ्याच अपेक्षा होत्या. 10 ते 12 डिसेंबर 1938 ला मुंबई येथे अस्पृश्य विद्यार्थी संमेलनात अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हटले की, विद्यार्थ्यांनी पदवी मिळवल्यानंतर शिक्षण सोडून देणे अयोग्य आहे. बी.ए,एम.ए. झाला म्हणजे सर्वज्ञान संपादन केले ही भावना चुकीची आहे. विद्येची गोडी आपण अंगी बाळगली पाहीजे. पदवीधरांनी सरकारी नौकरी मिळविण्यासाठी प्रयत्नशील असले पाहीजे. सध्या सरकारी नौकऱ्या एकाच जातीची मक्तेदारी बनल्या आहेत. जो समाज अधिकारांच्या पदावर नाही त्या समाजाचा कधीही विकास होत नाही. कारणी की, ब्राम्हण समाज सरकारी नौकऱ्यामध्ये असल्यामुळे त्यांच्याजवळ ताकत आहे ते आपली सत्ता स्थापित करू शकतो. आपला प्रभाव कायम ठेवू शकतो. म्हणून तुम्ही सरकारी नौकऱ्या मिळविण्यासाठी प्रयत्न केला पाहीजे. त्यातून समाजाचा अत्क्रर्ष होईल त्यासाठी पूर्ण प्रयत्न करा.[6] म्हणजेच शिक्षणाबरोबर आपला उदरनिर्वाह होऊन इतरही प्रश्न सोडविण्यास समाजाचा फायदा होऊ शकेल अशी त्यांची भावना होती.

त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिहीतात की, कोणत्याही मणुष्यांच्या बुध्दीवर योग्य संस्कार झाले असता त्यापासून काहीतरी फलप्राप्ती होते. बुध्दीप्रमाणेच मनुष्यांच्या अंतकरणालाही संस्काराची आवश्यकता आहे. आणि हा जो संस्कार करावयाचा त्यालाच शिक्षण म्हणतात.[7] म्हणजेच विद्यार्थ्यांना मनावर ज्याप्रकारे संस्कार होतात त्याप्रमाणेच तो घडत

असतो. प्रत्येक मनुष्यामध्ये सारख्याच प्रमाणात बुध्दी असते पण शिक्षणाने त्यांच्या बुध्दीचा अधिक विकास होऊ शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुले-मुलींना एकत्रित शिक्षणाचे समर्थन केले आहे. म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सहशिक्षणाचे पुरस्कर्ते होते. स्त्रियांसाठी वेगळी शाळा किंवा महाविद्यालये काढण्याची गरज नाही. स्त्रि-पुरूष सहशिक्षणामुळे स्त्रिया समाजात निर्भिडपणे वावरू शकतील असे बाबासाहेब म्हणतात. स्त्रियांच्या सहवासात राहून जो पुरूष आपले मत ताब्यात ठेवू शकतो व पुरूषांच्या सहवासात राहुन जी स्त्री आपले पाऊल वाकडे पडणार नाही अशी खबरदारी घेवु शकते त्यांनाच आमच्या मते नितीमान म्हणता येईल. त्यामुळे स्त्री-पुरूषांची नितीमत्ता वाढवावयाची असेल तर त्यांचा सहवास जितका जास्त होईल तितका आवश्य घडवून आणला पाहीजे. प्रथक ठेवल्याने अनितीचा आणि शांत न होता जास्त भडकणार आहे. हे कोणी विसरू नये असे बाबासाहेब म्हणतात.[8] म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री-पुरूषांना एकत्रित शिक्षण द्यावे असे सुचित केले आहे. यातूनच एकमेंकाची मने विकसीत होतात आणि त्यांच्यामधील वैचारिक अंतर कमी होऊन चांगल्या प्रकारचे शिक्षण घेऊ शकतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःला जिवनभर विद्यार्थी संबेधले. कारण त्यांनी संपूर्ण हयातभर अभ्यास केला त्यंाची ग्रंथसंपदाएवढी विपुल होती की, ते फक्त आपल्या जिवनात पुस्तकांशिवाय दुसरे काहीच खरेदी करत नव्हते. पुस्तकांसाठीच त्यांनी मुंबई या ठिकाणी ‘राजगृह‘ हे घर बांधले होते. विद्यार्थ्यांना संबोधून ते म्हणाले होते की, विद्यार्थी दशेत विद्यार्थ्यांनी

केवळ शिक्षण हेच एकमेव ध्येय बाळगले पाहीजे. शिक्षण घेतांना कोणत्याही राजकीय पक्षांच्या, नेत्यांच्या जाळयात अडकू नये. विद्यार्थ्यांनी जिवनात उच्च शिखर गाढले पाहीजे. आपल्यातील इतर कलागुणांचा विकास केला पाहीजे. शिक्षण व विद्यार्थी या गोष्टीशिवाय आपला उध्दार होणार नाही. उच्च शिक्षण संस्थामध्ये दलित, महिला व अन्य वंचित वर्गांना आरक्षण देण्याची मागणी त्यांनी केली होती. त्यांच्या 1930 च्या मुक्ती सभेत त्यांनी 'शिक्षण' हे सामाजिक न्यायाचे साधन आहे असे प्रतिपादन केले होते तसेच विचारांची स्वतंत्रता ही शिक्षणाची मूलभूत आवश्यकता आहे असे म्हटले होते.

सारांश :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्वातंन्त्र्य, समता, बंधुता व न्याय या मुल्यांवर आधारित समाज घडविण्यासाठी क्षैक्षणिक क्रांती झाली पाहीजे असे वाटत होते. म्हणूनच त्यांनी म्हटले होते की, "शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे जो ते प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही." म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तळागाळातल्या समाजाला शिक्षण मिळावे यासाठी 'पिपल्य एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना करून 20 जुन 1946 रोजी मुंबई येथे सिध्दार्थ महाविद्यालयाची स्थापना केली. नंतर महाड, पुणे, बंगळूरू आणि औरंगाबाद येथे सोसायटी मार्फत विविध शाळा, महाविद्यालये आणि वसतीगृहे यांच्या शाखा सुरू केल्या. तसेच डॉ.

बाबासाहेब आंबेडकर यांनी 19 जून 1950 रोजी औरंगाबाद येथे मराठवाड्यातील मागास मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. यातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मानवतेबद्दलचा उद्दात हेतु दिसून येतो. म्हणूनच अशा महामानवाच्या शैक्षणिक विचारांची आजही गरज आहे हे नाकारता येत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उच्च शिक्षण विषयक विचार सामाजिक समतेचे, आर्थिक विकासाचे व वैज्ञानिक दृष्टीकोनाचे समन्वय दर्शवितात. म्हणूनच अशा महामानवाच्या शैक्षणिक विचारांची गरज आहे हे आज नाकारता येत नाही.

संदर्भ :

1. दैनिक केसरी, 14 एप्रील 1991.

2. जनता, 22 सप्टेंबर 1951, एल.जी. मेश्राम, 'विमलकिर्ती', और बाबासाहेब अम्बेडकर ने कहा, खंड-5, राधाकृष्ण प्रकाशन नवी दिल्ली, 2008, पृ. 38.

3. डायमंड सामाजिक ज्ञान कोश, खंड-2, डायमंड प्रकाशन, पुणे, 2007, पृ. 952.

4. नवयुग, 13 एप्रील 1947, एल.जी. मेश्राम, 'विमलकिर्ती', और बाबासाहेब अम्बेडकर ने कहा, खंड-5, राधाकृष्ण प्रकाशन, नवी दिल्ली, 2008, पृ. 129.

5. 'नवयुग' उपरोक्त, पृ. 130.

6. जनता, 17 डिसेंबर 1938, एल.जी.मेश्राम, 'विमलकिर्ती', और बाबासाहेब अम्बेडकर ने कहा, खंड-3, राधाकृष्ण प्रकाशन, नवी दिल्ली, 2008, पृ. 126-129.

7. मुकनायक, 9 आक्टोंबर 1920, वसंतमुन, संपा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बहिष्कृत भारत, 15 जुलै 1927 आणि मुकनायक (1920) शैक्षणिक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, 1990, पृ. 413.

8. बहिष्कृत भारत (1927-1929) आणि वसंतमुन, संपा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बहिष्कृत भारत, 15 जुलै 1927 आणि मुकनायक (1920) शैक्षणिक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, 1990, पृ. 65.